The Berar General Education Society's


# SITABAI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, AKOLA

*(NAAC Reaccredited "A" grade)*

University Grants Commission, Sponsored
One Day National Conference
*On 30 January 2018*

# Economical Study of Regional Disparity in India

Special Issue of an International
**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIE**
IMPACT FACTOR SJIF (2016)-6.177
ISSN : [illegible]-4766 (P), ISSN : 2278-8808 (E)



**Editor**
**Dr. Prasannajit R. Gawai**

Scanned with CamScanner

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIP'. NART STUDIES SJIF 2016 – 6.177 ISSN: 2349-4766 (P), 2278-8808 (E)

109.

# प्रादेशिकवाद विकासात्मक समस्या

प्रा.डॉ.मेघराज ग. शिंदे
*सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर जि.बुलडाणा*

**प्रस्तावना:** विकासाचा विचार करीत असताना जसा विकास सर्वांगीण पाहिजे. त्याचप्रमाणे विकासात प्रादेशिक समतोल साधला गेला पाहिजे. प्रगत देशाच्या विकासापेक्षा मागास भागाच्या विकासाला अग्रक्रम दिला पाहिजे. परंतु प्रत्याक्षात असे घडले नाही. याउलट प्रगत देशाचा जास्त विकास होतो. आणि मागास प्रदेश तसेच राहतात. काही अभ्यासक विकास प्रक्रियेतील प्रादेशिक असमतोल हा केवळ एका राज्यापुरताच मर्यादित प्रश्न नसून त्याचे प्रत्यंतर आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यपातळीवरही असल्याचे स्पष्ट करतात, अमेरिका, इंग्लड, इटली, स्पेन इ. देशातही या समस्येकडे लोकांचे लक्ष वेधले आहे. प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यासाठी तेथील नैसर्गिक साधन संपत्ती , भूमी, पर्जन्यमान,नद्या आणि त्याचबरोबर भांडवल, उद्योगास लागणारी मानसिकता, सामाजिक,सांस्कृतिक मूल्ये इ.घटकांचा प्रभाव कारणीभूत ठरतो. प्रादेशिक असमतोल उदभवने जितके अपरिहार्य आहे. त्याचप्रमाणे विकसित आणि अविकसित प्रदेशातील असमानता म्हणजेच असमतोल शक्य तितका कमी करणे ही योजनाकारांच्या कक्षेतील बाब आहे कारण ह्या दोन्ही गोष्टी मानवी प्रयत्नांशी संबंधीत आहेत. इतके मात्र निश्चित की, भारतात प्रथम पंचवार्षिक योजनेपासून नऊ पंचवार्षिक योजना राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावर सुव्यवस्थ नियोजनातून राबविण्यात आल्या असल्या तरी काही राज्यात विकासाचा दर जास्त आहे.पंजाब, हरियाना, गुजरात , महाराष्ट्र, पश्चिम बंगाल हे विकसित प्रदेश आहेत. परंतु बिहार, ओरिसा, राजस्थान, मध्य प्रदेश उत्तर प्रदेश, मागासलेले असून या प्रदेशातील बहुतांशी लोकसंख्या दारिद्रयाने पछाडलेली आहे.

**प्रादेशिकवादाचा अर्थ :**

१) देशातील एखाद्या विशिष्ट भागावर देशापेक्षा अधिक प्रेम करणे, त्या विशिष्ट भागाचे हित पहाणे म्हणजे प्रादेशिकवाद होय .

२) ज्यांच्या निष्ठा अनेक प्रसंगी राष्ट्रापेक्षा त्यांच्यावर आणि कधी कधीतर राज्यापेक्षाही राज्यांतर्गत असलेल्या त्यांच्या भागावर केंद्रीत होतात त्यास प्रादेशिकवाद असे म्हणतात.

भारतातील अनेक घटक राज्यात दुर्दैवाने एकमेकाविषयी कमालीची तिरस्काराची भावना दिसून येते. एका राज्यातला नागरिक दुसऱ्या राज्यात परकीय नागरिकापेक्षा परका मानला जातो. त्यातूनच प्रादेशिकवादाचा उगम होतो. भारतातील जनतेच्या निष्ठा ह्या राष्ट्रापेक्षाही प्रदेशावरच अधिक प्रमाणात दिसून येतात.

**प्रदेशिकवादाची कारणे:–**

१) **भौगोलिक घटक** : कोणत्याही प्रदेशाच्या विकासासाठी भौगोलिक घटकाचे योगदान महत्वाचे असते. सुपीक जमीन, पाण्याची उपलब्धता, दळणवळणाच्या सोयी असल्यास प्रदेशाचा योग्य विकास होत असतो. पाऊस डोंगराळ भुमी , पाण्याचे दुर्भिक्ष, उत्पादनाच्या पारंपारिक पध्दती .एकाच प्रदेशातील उपप्रदेश हे वेगवेगळे असते. त्यामुळे असमतोल प्रत्यायास येतो. पंजाब व राजस्थानमध्ये फरक आहे. महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्र यात फरक आहे. विदर्भाचे वेगळेपण हा मुद्दा यातूनच उदयाला येतो.

२) **ऐतिहासिक घटक** : शासनकर्त्यांनी ज्या भूभागावर राजधान्या, व्यापारी केंद्रे सुरु केली त्या क्षेत्राचा विकास जलदगतीने झाल्याचे आढळून येते. अशा क्षेत्रांमध्ये कलकत्ता. दिल्ली , मुंबई, नागपूर ,मद्रास इ. शहराचा उल्लेख करता येईल. शासनकर्त्यांनी या भागाकडे जास्त लक्ष देवून दुसऱ्या भागाकडे दुर्लक्ष केलेल दिसते. वास्तविक पाहता सर्व क्षेत्राचा संतुलित विकास हे ध्येय अपेक्षित असते. परंतु प्रत्यक्षात योजना कार्यान्वित करतांना हा उद्देश विसरला जातो. आणि प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न निर्माण होतो.

३) **उद्योगधंद्याचे केंद्रीकरण** : ज्या भागात उद्योगधंद्याचे केंद्रीकरण झालेले असते. त्या भागाचा विकास सहज लक्षात येतो, रोजगाराच्या संधी आणि जीवनमान वरच्या पातळीवरचे असते. उद्योगांच्या दृष्टीने लहान मोठे उद्योग सुरु होऊन उद्योगाचे



330

116

एक जाळे तयार होते. उद्योगासाठी कच्चा माल, वीज, पाणी, श्रमिक, भांडवलाची गरज असते. परंतु हया गोष्टींची उपलब्धता असताना काही भाग मागासलेले आहेत. महाराष्ट्रात गडचिरोली जिल्हा, पुणे, मुंबईचे मोठया प्रमाणात औद्योगिकरण झालेले आहे. याउलट विदर्भातील काही जिल्हयात औद्योगिकरण नगण्य स्वरुपाचे आहे. थोडक्यात काही भागात उद्योगांच्या केंद्रीकरणाचे क्षेत्र असल्यामुळे ती पुढे आली आहेत.

**४) नियोजनातील दोष:** प्रादेशिक असमतोलाचे महत्वपुर्ण कारण म्हणजे नियोजनातील दोष हा होय . नियोजनकर्त्यांना विकासाचा समतोल साधने उद्देश ठेवला आणि प्रदेशातील उपप्रदेश तसेच जिल्हा या घटकाला आधार म्हणून योजनांची आखणी केली. आवश्यक तो अर्थ प्रबंध केला तर प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न उदभवत नाही. महाराष्ट्राचे उदा. लक्षात घ्यावयाचे झाल्यास शासनकर्त्यांनी योजना तयार करताना हया गोष्टी लक्षात घेतल्या नाहीत. त्यामुळे विदर्भ, मराठवाडयात अनुशेष वाढत गेला. त्यामुळे असमतोल स्पष्ट दिसत गेला.

**५) राजकीय इच्छाशक्तीचा अभाव :** भारतात लोकशाही शासनप्रणाली असून लोकसभा व विधानसभेत त्या त्या भागाचे प्रतिनिधित्व अनुक्रमे खासदार व आमदार करीत असतात. लोकशाही विकेंद्रीकरणातून तीन स्तरीय संस्था निर्माण केल्या आहेत. लोकांचे स्थनिक पातळीवरचे प्रश्न लक्षात घेऊन ते सोडविण्याची पध्दती स्वीकारलेली आहे. असे असताना प्रादेशिक असमतोल सारखा वाढत आहे. यामागे महत्वाचे कारण म्हणजे राजकीय इच्छाशक्तीचा अभाव हे होय. राजकीय नेतृत्वाने जागृत राहून आरंभापासून विकासाचा योजना राबविल्या तर अनुशेष राहत नाही.

**६) वंचिततेच्या भावनेचा अभाव :** प्रादेशिक असमतोल निर्माण होऊन तो सातत्याने त्याच स्थितीत राहण्यासाठी अविकसित क्षेत्रातील लोकांच्या मनात वंचिततेच्या भावनेचा अभाव हे कारण सांगता येईल, अविकसित क्षेत्रातील राजकीय नेते, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते , शिक्षणक्षेत्रातील अभिजन आणि सामान्य लोकांच्या मनात वंचितता निर्माण झाली नाही तर आहे ते योग्य आहे असे समजून ते कालक्रमण करित राहतात. आणि त्याचवेळी विकसित क्षेत्रातील अभिजन विकासाच्या योग आपल्या प्रदेशात कार्यान्वित करुन विकास घडवून आणतील. विकासासाठी लोकजागृती महत्वाची असते. तसेच आपण वंचित आहेत ही जाणीव सर्व क्षेत्रात पाझरली पाहिजे.

**७) उदासीनता :** आपला प्रदेश उपप्रदेशासाठी राजकीय नेते, उद्योजक उदासीन असले म्हणजे विकासाला गती देता येणार नाही. शेवटी प्रादेशिक विकास हा बाहय असला तरीही त्यातून साधतो तो मानव विकास. लोक उदासीन असले म्हणजे योजनांच्या संबंधात आग्रही राहत नाहीत. त्यासाठी अंदाजपत्रकात करावयाची तरतुद होत नाही. परिणाम इतर प्रदेशातील लोक सक्रिय होऊन जास्तीत जास्त फायदा करुन घेतला. थोडक्यात विकासाच्या प्रबळ प्रेरणाचा अभाव आणि लोकमतातील उदासीनता या मागासलेपणाला कारणीभूत आहेत.

**८) ईहवादी प्रेरणांचा अभाव :** विकासासाठी लोकांच्या मनात इहवादी प्रेरणा प्रभावी असल्या पाहिजेत. मॅक्स वेबरने म्हटल्याप्रमाणे इहवादी प्रेरणातून उन्नती साध्य होते. परंतु अशा इहवादी प्रेरणाचा अभाव असेल तर विकासाला महत्व दिले जात नाही. अर्थाजन, संपन्न जीवन मानवी क्षमतांचा उदय विकास होत नाही. म्हणून इहवादी प्रेरणांचा अभावातूनही असमतोल प्रत्ययास येतो.

**९) सांस्कृतिक आक्रमण :** भारत हा विविध संस्कृतीने युक्त असा देश आहे. त्यामुळे काही प्रदेशात सांस्कृतिक कारणानेच अक्रमणे होतात. स्वत:च्या संस्कृतीविषयी अभिमान बाळगणारे दुसऱ्याची संस्कृती नगण्य समजतात. त्यामुळे आपला भाग हा यांच्यापेक्षा पुढे गेलेला आहे. आमची माणसे म्हणजे योग्य बाकीच्या त्या भागातील लोकाविषयी न्युनगंड निर्माण होतो. आपल्या संस्कृतीविषयी असणारा अभिमान हाही घटक प्रादेशिकवादाला चालना देत असतो.

**१०) भाषिक भेद :** मॉरिस जोन्सच्या मते, भारतातील प्रांतवादाच्या सर्व समस्यांचे मुळ भाषिक मतभेदात आहे. भारतातील प्रदेशाची पूर्वापार रचना अशा प्रकारची आहे की, एक किंवा विशिष्ट भाषा बोलणारे लोक विशिष्ट प्रदेशात फार मोठया संख्येने राहतात. त्यामुळे तेलगू, गुजराती,मारवाडी अशा भाषावाचक जाती अस्तित्वात येतात. भाषावार प्रांतरचनेचा परिणाम असा झाला की त्यातुनच प्रादेशिकवादाला अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. भारतात भाषिकप्रश्न अत्यंत ज्वलंत असा प्रश्न आहे. विशिष्ट जनतेच्या मनात विशिष्ट भाषा बोलणाऱ्या समुहाविषयी अस्मितेची भावना व इतरविषयी तिरस्कार निर्माण होतो.

330



Scanned with CamScanner

**११) प्रादेशिक संघटन :** प्रादेशिकता ज्याप्रमाणे राजकीय पक्षाच्या भुमिकेमुळे निर्माण झाली विकासाला गती देता येणार नाही. शेवटी प्रादेशिक विकास हा बाह्य असला तरीही त्यातून साधतो तो मानव विकास लोक उदासीन असले म्हणजे योजनांच्या संबंधात जे आग्रही राहत नाहीत त्यासाठी अंदाजपत्रकात करावयाची तरतुद होत नाही. परिणाम इतर प्रदेशातील लोक सक्रिया होउन जास्तीत जास्त फायदा करुन घेतला

**१२) परकीय हात :** काही वेळा एखादया देशातील प्रादेशिकवादाच्या बाबतीत परकीयांचा हात हा घटक देखील जबाबदार मानण्यात येतो .कारण अनेक राष्ट्रे जाणीवपूर्वक दुसऱ्या राष्ट्रात फुटीरतेची भावना कशी निर्माण होईल आणि राष्ट्रीय एकात्मतेस कसा तडा जाईल यासाठी प्रयत्न करतात. आर्थिक पाठबळ, आधुनिक शस्त्राने इ. स्वरुपाची मदत पाठवून प्रादेशिक वादास खतपाणी देण्याचे कार्य अनेक राष्ट्रे करीत असतात. भारतीय प्रादेशिकवादास कारणीभूत परकीय हात आहे असे वारंवार म्हटले जाते.

**प्रादेशिकवादाचे परिणाम:** प्रादेशिकवादामध्ये अतिरेकी स्वरुप म्हणजे भारतातून फुटून स्वतंत्र राज्याची मागणी करणे असे प्रयत्न अनेकांनी केले १९५० मध्ये प्रमुख पक्षाचा दृष्टिकोन भारतातून फुटून निघून द्रविडीस्थानची निर्मिती करण्याचा होता. अनेक प्रयत्न झाले. या सर्व बाबी प्रादेशिकवादाच्या भावनेचे एक टोकाचे रूपच होत्या .प्रदेशभावना

फुटीर झाल्या की राष्ट्राचे ऐक्य धोक्यात येते. भाषिक ,जातीय , धार्मिक भावनेवरून तडे पडत असतात. प्रादेशिक असमतोलाचे अनेक परिणाम समाज जीवनावर होतात ते पुढीलप्रमाणे आहेत.

**१) राष्ट्रीय एकात्मतेला अडथळा :** प्रादेशिक विषमतेमुळे मनात परस्परांसंबंधी इर्षा आणि असंतोषाची भावना वाढीस लागते आमच्या प्रदेशाच्या विकासात दूसरे प्रदेश अडथळे आहेत. अशा भावनेमुळे ताण–तणाव व अशांतता प्रत्ययास येते. राष्ट्रीय एकात्मता परिषदेने १९७१ आर्थिक विकासातील प्रादेशिक असमतोल राष्ट्रीय ऐक्यासमवेतच एका प्रदेशातील उपप्रदेशात विकासाच्या असमतोलामुळे संशय आणि द्वेश आणि अशांतता दिसून येते. भावनात्मक ऐक्याला बाधा निर्माण होते.

**२) संघर्षाचा उद्‌भव :** प्रादेशिक विषमतेचा प्रश्न जेव्हा चर्चेला येतो. तेव्हा बऱ्याच वेळा त्यात दोन पक्ष निर्माण होतात. एकपक्ष प्रादेशिक असमतोल नाही असे सिध्द करतो तर दुसरा पक्ष विविध प्रकारची उदाहरणे देऊन असमतोलाचे स्पष्टीकरण देतो. अशा विभिन्न मतप्रवाहाच्या समर्थकामध्ये ताण, तणाव आणि काही प्रसंगी संघर्ष सुध्दा उदभवतो.

**३) विभाजन चळवळी :** प्रदेशिक असमतोलाचे निराकरण वर्तमान शासन व्यवस्था करु शकत नाही. या संदर्भात पुर्वीच्या राज्यकर्त्यांनी कोणतेही ठोस प्रयत्न केले नाही. उलट त्यांनी आमच्या प्रदेशाचे सतत शोषण केले आहे. तेव्हा आमच्या समाजाचा सर्वांगीण विकास आम्हीच करु अशी भूमिका घेऊन प्रदेश विभाजनाच्या चळवळींना योग्य प्रतिसाद मिळालेला नाही. अशा विभाजनवादी चळवळीचे मूळ प्रादेशिक असमतोलात असते. त्यांना वंचिततेची जाणीव असते. अशा चळवळी काही प्रमाणात हिंसक रूप धारण करतात . यात आर्थिक व मनुष्य हानी होऊ शकते.

**४) सामाजिक समस्या वाढतात:** प्रादेशिक असमतोलामुळे काही क्षेत्राचा मोठया प्रमाणात विकास होतो. याउलट उर्वरित क्षेत्र अविकसित राहते. हया अविकसित भागातील लोकांना रोजगाराच्या संधी मिळत नाही. त्यातून बेरोजगारीचा प्रश्न उदभवतो. लोकांचे जीवनमान निम्नस्तरात समाविष्ट असते. ज्यामुळे दारिद्र्याची समस्या जटिल बनते. कारखानदारी न वाढल्यामुळे बऱ्याच लोकांना निकृष्ट प्रकारचे व्यवसाय स्वीकारावे लागतात. दळणवळणाच्या मर्यादित सुविधा, पक्क्या रस्त्याचे अल्प प्रमाण, पेयजलाचा प्रश्न, शिक्षणाच्या सोयीचा प्रश्न या सारख्या गोष्टीमुळे समस्यांची संख्या वाढत जाते.

**५) लोकसंख्येचे स्थानांतरण:**

विकसित प्रदेशात रोजगाराच्या संधी असतात. या तुलनेत अविकसित प्रदेशात हंगामी व कायम स्वरूपाच्या बेकारीची समस्या असते. साहजिकच लोक उपजिविकेसाठी विकसित प्रदेशाकडे स्थानांतराचे प्रमाण जास्त असते. अशा स्थानांतरामुळे झोपडपट्याचे प्रश्न, रहदारीचा प्रश्न, घराचा प्रश्न आणि त्या अनुषंगाने अनेक प्रश्न निर्माण होतात.

**६) लहान राज्याची निर्मिती :** लहान–लहान राज्याची निर्मिती हा एक प्रादेशिकवादाचाच परिणाम असतो. कारण विशिष्ट भाषा, धर्म इत्यादीवर आधारीत लहान राज्याची निर्मिती ही अनेक दृष्टीने गैरसोयीचे असते. कारण एखादे लहान राज्य निर्माण करायला सुरवात करणे गैरसोयीचे असते. प्रादेशिकवृत्ती अधिकाधिक संकुचित होते. राज्याचा आर्थिक विकास हा राज्याच्या आर्थिक विकासावरच आधारित आहे.



Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana

118

Scanned with CamScanner

७) विघटीत राजकारण : व्यापक अशा राजकारणाऐवजी विघटित राजकारणाला सुरुवात प्रादेशिवादातून निर्माण होते. प्रादेशिकवादाचे टिकाकार असे म्हणतात की, प्रादेशिक भावना रामविण्यासाठी काही प्रादेशिक नेत्यांचा महत्वकांक्षासाठी फक्त लहान राज्यांच्या मागण्या होतात. आर्थिक व सांस्कृतीक इत्यादी कारणे केवळ राजकीय असतात. राष्ट्रीय हितापेक्षा संकुचित हिताला जोपासणारी असतात. प्रादेशिकतेला प्राधान्य दिल्यास प्रादेशिक प्रवृत्ती अधिक संकुचित होतात.

प्रादेशिकवादावरील उपाययोजना :

१) निकोप भावनेची रूजवणूक करावी :

२) संस्कारक्षम शिक्षणप्रणालीचा विकास :

३) आर्थिक सामाजिक मागासलेपण निर्मुलनासाठी प्रयत्न :

४) एकसमान राष्ट्रभाषेचा विकास :

५) संस्कारक्षम शिक्षणप्रणालीचा विकास :

६) अतिरेकी चळवळींना पायबंद घालावा:

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana



Scanned with CamScanner